दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरुपात...
दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरु..!
ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा
www.diwanews.com
आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..
epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–३० ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २७ फेब्रुवारी २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## सहा.आयुक्तांविरोधात नागरिकांचा मोर्चा

## ठाणे महापालिकेचे प्रमुख असणाऱ्यांनी गंभीर दखल घ्यायला हवी!

# अधिकाऱ्यांची टपोरी भाषा आणि राजकीय भूमिका, लोकप्रतिनिधीं सोबतचा संघर्ष वाढविण्यास कारणीभूत ठरेल!

**ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या एका सहाय्यक आयुक्ताविरोधात नागरिकांचा मोर्चा निघतो. हा मोर्चा संबंधित अधिकारी गुंड व भ्रष्ट प्रवृत्तीचा असल्याचा निषेध म्हणून निघतो,ही स्थानिक स्वराज्य संस्था मधील पारदर्शक कारभारा बाबत चिंताजनक स्थिती आहे असं म्हणावे लागेल. अधिकाऱ्यांना होणाऱ्या मारहाणीचे कधीही समर्थन होणार नाही मात्र त्याच बरोबर अधिकाऱ्यांचे पदावर असताना राजकिय कार्यकर्त्यासारखे कामही मान्य होणारे नाही.**

राज्याचे प्रमुख असणाऱ्या लोकांनी किमान प्रशासन तरी पारदर्शक कारभार आणि निःपक्षपाती पणे काम करणारं असावं याकडे आता लक्ष देणे गरजेचे आहे. एक आमदार एका ठाणे महापालिका सहा आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यावर वारंवार गंभीर आरोप करतो... संबंधित अधिकारीही सराईत

दिवा न्यूज सडेतोड

राजकारण्याप्रमाणे सदर आमदारावर गंभीर स्वरूपाचे आरोप करतो. हे ठाणे शहराचे भूषण नक्कीच नाही. ठाण्यातील पालिका प्रशासनाच्या प्रमुखांनी आणि ज्यांच्या देखरेखीखाली महानगरपालिकांचा कारभार चालतो

**(पान २ वर)**

# चिंताजनक, जुन्या व धोकादायक इमारतीबाबत पालिकेने वेळीच उपाययोजना करणे गरजेचे!

## पहिल्या माळ्यावरील स्लॅबचे प्लास्टर पडून भाऊबहीण जखमी; कळव्यातील घटना

**ठाणे:** कळवा, विटावा सुर्या नगर येथील श्री साईनिवास बिल्डिंगच्या पहिल्या मजल्यावरील रूम नंबर १०४ च्या स्लॅबचे प्लास्टर पडले तसेच कॉलमला देखील तडे गेल्याची घटना शनिवारी सकाळी पावणेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेत,अक्षित आशिष सिंग (४) आणि आर्या (७) हे भाऊ बहीण जखमी झाले असून त्यांना उपचारार्थ ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात दाखल केले आहे.

**(पान २ वर)**






# बृहन्मुंबई महापालिकेच्या लाचखोर अधिकाऱ्याला चार वर्षे कैद

## ठाणे न्यायालयाचा निकाल

**ठाणे:** जकात चुकविणाऱ्यांना गाड्यांना लावलेला ३० लाखांचा दंड कमी करण्यासाठी १० टक्क्यांची म्हणजे तीन लाखांची मागणी करत ती लाचेची रक्कम स्वीकारणारे बृहन्मुंबई महापालिका कांजूर मार्ग विभागाचे व्हिजीलन्स शाखा उपकर निर्धारक व संकलक सुनील बळीराम बने याला ठाणे विशेष लाचलुचपत न्यायाधीश तथा ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश अमित शेटे यांनी दोषी ठरवून चार वर्षे साधी कैदेची शिक्षा शिक्षा सुनावली. अशी माहिती सरकारी वकील संजय मोरे यांनी दिली. हा प्रकार २९ मे २०१४ साली, नवीमुंबई वाशी जकात नका येथे घडला होता. याप्रकरणी तत्कालीन महापालिका आयुक्तांसह चार जणांची साक्ष नोंदविण्यात आली होती. तर लाच देण्यास प्रोत्साहन देणाऱ्या पर्यवेक्षी निरीक्षक, बुध्दी संपदा कक्ष व्हिजीलन्स शाखेचे संजय मारूती लोहोट यांची निर्दोष सुटका झाली आहे.

२९ मे २०१४ रोजी ऑक्ट्रॉयची कामे करीत असलेल्या कंपन्यापैकी एका ट्रान्सपोर्टरचे मालाने भरलेले सात



टेम्पो वाशी जकात नाक्यावर बृहन्मुंबई महानगरपालीकेच्या जकात विभागाच्या अधिकाऱ्यांनी अडवून जकात न भरल्याचे कारण दाखवून त्या टेम्पो मालासहीत जप्त करण्यात आले. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जकात विभागाच्या कांजूरमार्ग येथील कार्यालयातील जकात विभागाचे व्हिजीलीन्स पथकाचे अधिकारी आरोपी बने यांनी तक्रारदारांना बघ, तुझ्या गाडया सोडायच्या की नाहीत ते माझ्यावर आहे. तुला कमीत कमी ३० लाख रुपये दंड भरावा लागेल, तू ऑफिसला येवून दंड भर आणि गाडया घेवून जा. तसेच ३० लाख दंडापैकी तुझी रक्कम कमी करून देईल,पण त्या बदल्यात तुला ३० लाखाचे दहा टक्के म्हणजे मला तीन लाख रूपये दयावे लागतील असे म्हटले. अशाप्रकारे तीन लाखांच्या लाचेची रक्कम स्वीकारली. याचदरम्यान संजय लोहोट याने लाच देण्याकरिता प्रोत्साहन दिले. म्हणून दोघांविरोधात राबोडी पोलीस ठाण्यात

लाच स्वीकारणे, लाच देण्याकरिता प्रोत्साहन देणे तसेच आपल्या पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट मार्गाने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी लाचेची मागणी करून लाच स्वीकारली, म्हणून गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने त्या दोघांना अटक करत, दोषारोपपत्र ठाणे न्यायालयात दाखल करण्यात आला. त्या खटल्यात सरकारी वकील संजय मोरे यांनी सादर केलेले पुरावे व चार साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून आरोपींना ठाणे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश अमित शेटे यांनी दोषी ठरवून चार वर्षे साधी कैद आणि १० हजार दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. याप्रकरणी तत्कालीन तपास अधिकारी म्हणून पो. निरीक्षक अरुणकुमार सपकाळ आणि पैरवी म्हणून पोलीस हवालदार साजिद शहा आणि पारधी काम पाहिले.

### ▶ धावत्या कारला किरकोळ आग

**ठाणे:** नाशिक-मुंबई वाहिनीवरून भिवंडी येथून ऐरोली येथे निघालेल्या कारला ठाण्यातील रुस्तमजी फायर स्टेशन समोर मंगळवारी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास आग लागली. ही आग किरकोळ स्वरूपाची होती. तसेच आगीवर काही मिनिटात नियंत्रण मिळविण्यात यश आले. तसेच ही कार मेहर अली हा चालक चालवत होता. त्यावेळी लागलेल्या आगीची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवानांनी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविले. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

### ▶ एसी युनीटला आग

**ठाणे:** टेंभी नाका येथिल आनंद पॅलेस बिल्डिंग यातळ अधिक ६ मजली इमारतीमधील सहाव्या मजल्यावरील रूम नंबर- ६०१ च्या खिडकी मध्ये ठेवलेल्या लाकडी प्लाउड व जवळच असलेल्या एसी आउट डोअर युनिटला आग लागली. ही घटना मंगळवारी रात्री अकराच्या घडली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महावितरण , आपत्ती व्यवस्थापन कक्ष व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेत, अर्ध्या तासात ती आग नियंत्रणात आली. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

### ▶ हॉटेल्सच्या भट्टीला आग

**ठाणे:** घोडबंदर रोड, ओवळा येथे श्री संकल्प बिल्डिंगच्या तळ मजल्यावरती असलेल्या मे. मिस्टर ग्रिल हॉटेल्सच्या बाहेर असलेल्या भट्टीला आग लागल्याची घटना बुधवारी पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत आगीवर काही मिनिटात नियंत्रण मिळविले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# चिंताजनक, जुन्या व धोकादायक इमारतीबाबत पालिकेने वेळीच उपाययोजना करणे गरजेचे!

(पान १ वरून)

दोघांना किरकोळ दुखापत झाली असून स्लॅबचे प्लास्टर पडलेली रूम रिकामी करण्यात आली आहे. तसेच रूमला सील करून त्या रहिवाशांनी नातेवाईकांकडे हलविण्यात आले आहे. तसेच ही इमारत अनधिकृत असल्याची माहिती प्रभाग समितीने दिली आहे.

कळवा विटावा येथे असलेले श्री साईनिवास बिल्डिंग ही तळ अधिक चार मजली असून ती १५ वर्षे जुनी आहे. तेथे एकूण ४५ कुटुंब वास्तव्यास आहेत. पहिल्या मजल्यावर रूम नंबर १०४ ही गौतम शहा यांच्या मालकीची असून त्यांनी ती रूम आशिष सिंग यांना भाड्याने दिली आहे. त्याच रूमच्या स्लॅबचे प्लास्टर पडले असून कॉलमला देखील तडे गेले आहेत. तसेच दोघे जखमी झाल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी कळवा कार्यालयीन अधीक्षक सोपान बाईक यांच्यासह बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता, उप- अभियंता, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी (कळवा प्रभाग समिती) व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी यांनी धाव घेतली. जखमींना रुग्णालयात दाखल केले. यामध्ये अक्षीत याच्या डोक्याला कानाला तर आर्या हिच्या डोक्याला आणि कमरेला किरकोळ दुखापत झाली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

# सहा.आयुक्तांविरोधात नागरिकांचा मोर्चा

**(पान १ वरून)** अशा नगर विकास विभागाने सुद्धा या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. प्रशासन विरुद्ध लोकप्रतिनिधी अशा स्वरूपाचा संघर्ष योग्य नाही. एखाद्या अधिकाऱ्याने राजकिय भाष्य करत आपल्या मर्यादा ओलांडणे याचे समर्थन होणार नाही. अधिकारी ही राजकारण करू शकतात पण त्यासाठी त्यांनी प्रशासनातील पदाचा राजीनामा द्यायला हवा. पालिका अधिकारी महेश अहिर विरोधात निघालेला मूक मोर्चा हा राजकीय हेतूने प्रेरित आहे असं काही जण म्हणतील. तसं म्हणण्याला वाव देखील आहे.मात्र एखाद्या अधिकाऱ्या विरोधात एखाद्या राजकीय पक्षाने मोर्चा काढणं आणि तो राजकीय असल्याचं विरोधकांनी म्हणणं... असं कोणतं राजकारण संबंधित अधिकारी आणि राजकीय पक्ष यांच्यामध्ये घडतंय? हे जाणून घेण्याचा अधिकार ही ठाणेकर जनतेला आहे. मुळात प्रशासनातील कर्मचारी आणि अधिकारी यांनी जनते प्रती निर्णय घेताना निःपक्ष असायला हवं. कोणत्या एका विचारधारेच्या किंवा कोणत्या एका पक्षाच्या बाजूने अधिकाऱ्यांनी झुकता कामा नये. हा संकेत पाळायलाच हवा. मात्र अलीकडे असं होतंय का? हा संशोधनाचा विषय आहे. अधिकारी जर दुजाभाव पद्धतीने निर्णय घेऊ लागले तर विरोधातील विचारधारेच्या लोकांचा त्यांच्यावरचा विश्वास उडतो. परिणामी त्या विचारधारेचे फॉलोअर्स असणारे मतदार,नागरिक त्या अधिकाऱ्यांच्या विरोधात जातात. यातून त्या अधिकाऱ्याची नकारात्मक प्रतिमा बनत जाते. पालिका प्रशासनात असणाऱ्या किंवा सरकारी प्रशासनात असणाऱ्या अधिकाऱ्यांनी याची नोंद घ्यायला हवी. शासकीय कारभार हाकताना तारेवरची कसरत कशाला म्हणतात? हे दाखवून द्यायला हवं! असं जर केलं नाही तर त्यातून महेश अहिर विरोधात निघालेल्या मोर्चा सारखी परिस्थिती निर्माण होऊ शकते. ही परिस्थिती वाढत गेल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पारदर्शक कारभार अडचणीत येऊ शकतो,याची नोंद राजकारणी, अधिकारी आणि नागरिकांनीही घ्यायला हवी. जबाबदार वरिष्ठ अधिकारी आणि जनतेचे हित बघणारे राजकारणी याची नोंद घेतील अशी अपेक्षा करायला हरकत नाही.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**





पाणी, रस्ते आणि पोलिसांची गस्त,ठाणे आणि केडीएमटी परिवहन सेवा या मूलभूत गरजा दिव्यातील बेतवडे परिसरातल्या रुणवाल माय सिटीतील रहिवाश्यांना मिळाव्यात यासाठी येथील नागरिकांनी आपले गाऱ्हाणे आमदार राजू पाटील यांच्याकडे मांडले. या समस्या तातडीने सोडवण्याचे प्रयत्न करेन असे आश्वासन यावेळी राजू पाटील यांनी दिले.यावेळी भाजपचे दिवा शहर अध्यक्ष रोहिदास मुंडे हे देखील उपस्थित होते. त्याचबरोबर मनसे जिल्हा संघटक हर्षद पाटील यांसह नागरिक उपस्थित होते.



## चर्चेचा मुद्दा..!


डम्पिंग ग्राउंड बंद झालं, पण हा धूर कधी बंद होणार ? असाचं रोज धूर होत राहिला तर ऑक्सिजन सिलेंडर लावून फिरायचं का आम्ही ? धूर बंद होण्यासाठी महापालिकेने एकदाची काय ती उपाययोजना करा, नाहीतर उपयोग काय डम्पिंग बंद केल्याचा?

– प्रशांत गावडे, दिवा मनसे यांची फेसबुक पोस्ट





दिवा गावातील देवदत्त सुनील भगत आणि प्रभात सुनील भगत यांच्या एन.आर.नगर, दिवा पश्चिम येथे नवीन मेडिकल स्टोअरचे उद्घाटन शिवसेना उपशहर प्रमुख अँड.आदेश भगत यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी त्यांनी देवदत्त आणि प्रभात ला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



भाजपा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा सौ.माधवी नाईक या नुकत्याच दिवा शहरात आयोजित प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाप्रसंगी आल्या असता, दिवा भाजपच्या महिला मंडळ अध्यक्षा ज्योती पाटील यांनी त्यांची भेट घेतली. पक्षाच्या वाटचालीबाबत व जनतेसाठी राबवयाच्या उपक्रमाबाबत ज्योती पाटील यांनी माधवी नाईक यांच्याकडून मार्गदर्शन घेतले. यावेळी माधवीताई नाईक यांनी ज्योती पाटील यांच्या कामाचे कौतुक केले.

## वाहनतळ बंद ठेवणे हे ठामपाचे पार्किंग धोरण आहे का? काँग्रेसचा सवाल

**ठाणे:** वाहतूक कोंडी व पार्किंगची समस्या सोडवण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले गावदेवी मार्केट, गावदेवी मैदान, कुस्तीगीर भवन इमारतीच्या बाजूला असलेला वाहनतळ हे तिन्ही वाहनतळे बंद ठेवणे हे महानगरपालिकेचे पार्किंग धोरण आहे का असा सवाल ठाणे काँग्रेसने केला आहे. तसेच ते सुरू करण्यासाठी कोणाची वाट पाहता. ठाणेकर नागरिकांची गैरसोय सोडणे महत्वाचे की कोणासाठी ते बंद करून ठेवणे योग्य आहे. ठाणेकरांची गरज लक्षात घेऊन ते तातडीने सुरू करा अशी मागणीही काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी केली आहे. ठाणे रेल्वे स्टेशन परिसरात वाहनतळाची पुरेशी सुविधा उपलब्ध नाही. तर दररोज रेल्वेने प्रवास करणारे ठाणेकर घर ते रेल्वे स्थानकापर्यंत दुचाकीचा वापर करतात. पण स्टेशन परिसरात पार्किंगसाठी पुरेशी जागा नाही. याशिवाय स्टेशन जवळील मुख्य बाजारपेठेत चारचाकी वाहन घेऊन येणाऱ्यांची संख्या मोठी आहेत. परंतु या वाहनांना देखील पार्किंगसाठी कुठेही जागा उपलब्ध नाही. पार्किंग अभावी नागरिकांना टोविंग व्हॅन,नो पार्किंग दंडाचा मोठ्या प्रमाणात भुर्दंड पडत आहे. असेही पिंगळे यांनी निर्दशनास आणून दिले आहे.

# वाघबीळ आणि ओवळा अशी मेट्रो स्टेशनची नावे राहणार

## – आमदार प्रताप सरनाईक



**ठाणे:** गायमुख कासारवडवली ते वडाळा मेट्रो-४ या मेट्रोच्या कामासंदर्भात तसेच विजय गार्डन ऐवजी वाघबीळ मेट्रो स्टेशन तसेच गोवन पाडा ऐवजी ओवळा मेट्रो स्टेशन असे नामकरण करण्यास एमएमआरडीएचे आयुक्त श्रीनिवासन यांची आमदार प्रताप सरनाईक यांनी भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी आमदार सरनाईकांनी नामकरणाबाबत ग्रामस्थांची मागणी मांडल्यावर एमएमआरडीएचे आयुक्तांनी ग्रामस्थांच्या मागणीला हिरवा कंदील दाखवला. त्यामुळे वाघबीळ आणि ओवळा अशी मेट्रो स्टेशनची नावे राहणार असल्याचेही आमदार सरनाईकांची यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली.

काही दिवसांपूर्वी वाघबीळ गाव व ओवळा गाव तसेच आजूबाजूच्या परिसरातील ग्रामस्थांनी आमदार प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी विजय गार्डन मेट्रो स्टेशन नावाऐवजी वाघबीळ गाव मेट्रो स्टेशन व ओवळा येथील गोवन पाडा या मेट्रो स्टेशनचे नाव ओवळा मेट्रो स्टेशन करण्यासंदर्भात तीव्र भावना व्यक्त करून ज्या भुमिपुत्रांनी आपल्याला जमिनी कुठलाही मोबदला न घेता अथवा कवडीमोल भावाने शासनाला विकास कामासाठी दिल्यानंतर जर त्यांच्या वाघबीळ व ओवळा गावाचे गावपण ही टिकणार नसेल तर आम्हाला आंदोलन करावे लागेल, अशी भुमिका घेतली असता आमदार सरनाईक यांनी भुमिपुत्रांच्या रास्त मागणीचा विचार करून त्या दोन्ही नावे बदलण्यासंदर्भात १७ फेब्रुवारी, २०२३ रोजी एमएमआरडीएच्या आयुक्तांना पत्र दिले होते. तसेच बुधवारी एमएमआरडीएच्या कार्यालयात आयुक्त श्रीनिवासन आणि आमदार सरनाईक यांच्या झालेल्या बैठकीमध्ये विजय गार्डन ऐवजी वाघबीळ मेट्रो स्टेशन तसेच गोवन पाडा ऐवजी ओवळा मेट्रो स्टेशन असे नामकरण करण्यास एमएमआरडीएचे आयुक्त श्रीनिवासन यांनी मान्यता दिली. असे म्हटले आहे. तसेच पुढे बोलताना सरनाईकांनी शिवसेना ही नेहमीच बाळासाहेबांच्या विचाराने चालणारी संघटना असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार भुमिपुत्रांच्या व स्थानिकांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिल्याचे चित्र आज या कृतीतून सिध्द झाले असल्याचे सांगितले.

## वाहतुक पोलिसांनी केली साडेआठ लाखाहून अधिकची दंडात्मक कारवाई

**ठाणे:** ऑल आऊट ऑपरेशन अंतर्गत ठाणे शहर वाहतुक शाखेकडून ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात पाच तासात राबविलेल्या मोहिमेत २ हजार २३६ वाहनांची तपासणी केली. त्यानुसार १ हजार ५५३ वाहन चालकांकडून वाहतूक नियम धाब्यावर बसल्याचे समोर आले. त्यांच्याकडून ८ लाख ५९ हजार ४०३ रुपयांचा दंड वसुल करण्यात आला.

यामध्ये ४४३ ऑटो रिक्षा चालकांकडून १ लाख ४७ हजार ५०३ रुपयांचा दंडाचा समावेश आहे. तसेच मद्यप्राशन करून गाडी चालविणाऱ्या ६० जणांना पकडून त्यांना न्यायालयात हजर राहण्यास सांगितले आहे. तर विना परवाना गाडी चालविणाऱ्या २६ जणांकडून ७७ हजार, गणवेश परिधान न करणाऱ्या ८५ जणांकडून ६० हजार ५००, विना हेल्मेट गाडी चालविणाऱ्या ४७७ चालकांकडून २ लाख ३९ हजार ५००, सिग्नल तोडणाऱ्या ५१ चालकांकडून ५१ हजार ५००, सीट बेल्ट न लावणाऱ्या ६४ चारचाकी चालकांकडून १४ हजार ७००, गाडी चालवताना मोबाइल बोलणाऱ्या १३ जणांकडून २४ हजार आणि इतर कारवाईत ३३४ चालकांकडून २ लाख ४४ हजार ७०० रुपये दंड वसूल केला आहे. अशी माहिती वाहतुक पोलिसांनी दिली.

# ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव विनावापर पडूनच



## प्रशासनाच्या गलथान कारभाराविरोधात आमदार संजय केळकर संतप्त

**ठाणे: बाळकूम येथील ऑलिम्पिक दर्जाचा तरण तलाव लोकार्पणानंतरही एक वर्ष विनावापर पडूनच असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. आमदार संजय केळकर यांनी अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करून प्रशासनाला फैलावर घेतले.**

एप्रिलपासून शाळांना सुट्टी पडणार असल्याने विद्यार्थ्यांसाठी मैदाने, जलतरण तलाव सज्ज ठेवणे गरजेचे असताना बाळकुम येथील २७ कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेला धर्मवीर आनंद दिघे तरण तलाव अद्याप विनावापर पडून असल्याचे उघडकीस आले आहे. आमदार संजय केळकर यांनी ठाणे महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करत प्रशासनाच्या गलथान कारभारावर ताशेरे ओढत एप्रिलआधीच तलाव जलतरणपटू, सर्वसामान्य नागरीक आणि विद्यार्थ्यांसाठी खुले करण्याची मागणी केली. यावेळी ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी रोहित गुप्ते, बांधकाम विभागाचे अधिकारी आनंद नांदगावकर आदी अधिकारी उपस्थित होते.

मागील वर्षी २७ फेब्रुवारीला या तलावाचे लोकार्पण करण्यात आले. तेव्हापासून आजतागायत हा तलाव वापरात नसल्याने ठाणेकरांच्या करूपी पैशाची उधळपट्टी होत असल्याबाबत केळकर यांनी संताप व्यक्त केला. या तलावात पुढील टप्प्याची काही कामे शिल्लक असून आठ कोटींच्या निविदा काढण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. ही कामे झाल्यानंतरच हा तलाव खुला करण्यात येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### मग लोकार्पणाची घाई का केली

जर कामे पूर्ण झाली नाहीत तर तलावाचे लोकार्पण करण्याची घाई का केली? एप्रिलपासून शाळेला सुट्ट्या पडणार असताना आता निविदा काढल्यास तलाव आणखी काही महिने रखडणार आहे. यात प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष आणि गलथान कारभार दिसत असून ठाणेकरांच्या पैशाची ही उधळपट्टी असल्याचा आरोप केळकर यांनी केला. एप्रिलआधीच कामे पूर्ण करून तलाव खुला करण्यात यावा, असा दम केळकर यांनी अधिकाऱ्यांना भरला. बाळकुम येथील राम मारुती नगर रस्त्याचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून बंद असून माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती कार्यालयात स्थानिक समस्यांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आमदार केळकर यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या होत्या. त्यानुसार या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले. बाळकुम नाका ते माजिवडे-मानपाडा प्रभाग समिती कार्यालयापर्यंत काँक्रीट रस्ता आणि बाळकुम पाडा नंबर ३ भूमिगत गटार आणि रस्त्याच्या कामाचीही केळकर यांनी पाहणी केली. यावेळी अधिकाऱ्यांसमवेत भाजपचे रविराज रेड्डी, हेमंत म्हात्रे, निलेश पाटील, तृप्ती सुर्वे, दत्ता घाडगे रुनवाल सोसायटीचे पंकज कारंडे, सचिन शिंगारे व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# *उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार-२०२२ करिता प्रवेशिकांना ८ मार्चपर्यंत मुदतवाढ*

***मुंबई :*** *माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार देण्यात येतात. सन २०२२ च्या पुरस्कारासाठी दिनांक १ जानेवारी, २०२२ ते ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका दि. ३१ जानेवारी २०२३ पर्यंत मागविण्यात आल्या होत्या, तथापि, प्रवेशिका पाठविण्यास ८ मार्च २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.*

*उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२२ चे माहितीपत्रक/अर्जाचे नमुने महासंचालनालयाच्या dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच राज्यातील विविध भागातील स्पर्धकांना संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांना, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२ येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घेता येईल.*

# बोगस दिव्यांगांवर कारवाई करा!

## -आमदार दौलत दरोडा

**ठाणे:** ठाणे जिल्हा परिषदेमध्ये दिव्यांग आरक्षणातून सेवेत आलेल्या तसेच बदली प्रक्रियेत दिव्यांग प्रमाणपत्राचा लाभ घेतलेल्या कर्मचाऱ्यांची वैद्यकीय मंडळाकडून तपासणी करून बोगस दिव्यांगांवर कारवाई करण्याची मागणी आमदार दौलत दरोडा यांनी ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

शासकीय व निमशासकीय नोकर भरतीमध्ये अ ते ड पदासाठी सरळ सेवा व पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना चार टक्के आरक्षणाचा लाभ मिळतो. बदली प्रक्रियेत ही विशेष प्राधान्य मिळत असल्याने अलीकडे बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. बीड जिल्हा परिषदेने वैद्यकीय मंडळाकडून कर्मचाऱ्यांची तपासणी केली असता दिव्यांग प्रमाणपत्रावर नमूद अपंग टक्केवारी व प्रत्यक्षात तपासणीतून आढळलेले दिव्यांगाचे प्रमाण यामध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत आढळल्याने बीड जिल्हा प्रशासनाने ७८ शिक्षकांना निलंबित केले आहे. बोगस प्रमाणपत्राची व्याप्ती बीड जिल्ह्यापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण राज्यभर असण्याची शक्यता दिव्यांग बांधव व शिक्षक संघटना कडून व्यक्त केली जात आहे.

दिव्यांगाना समाजामध्ये सन्मानाने जगता यावे म्हणून शासनाने नोकरीत व बदली प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. मात्र हे लाभ काही ठग बोगस प्रमाणपत्राच्या आधारे लाटत असल्याने खरे लाभार्थी वंचित रहात आहेत हा खऱ्या दिवंगांवर अन्याय आहे. तसेच ही शासनाची फसवणूक असल्याने विशेष कॅम्प आयोजित करून दिव्यांग व त्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याची मागणी आमदार दरोडा यांनी पत्रात केली आहे.

# मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने ठामपातर्फे निमंत्रितांचे कवी संमेलन

**ठाणे:** कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्ताने साजऱ्या केल्या जाणाऱ्या मराठी भाषा गौरव दिनी ठाणे महानगरपालिकेतर्फे निमंत्रितांचे कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. सोमवार, २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून ठाणेकर रसिकांना राज्याच्या विविध भागांतील कवींच्या काव्य सादरीकरणाचा आस्वाद घेता येणार आहे.

ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर यांच्या अध्यक्षतेखाली या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. निमंत्रितांच्या कवी संमेलनात प्रा. डॉ. प्रज्ञा पवार, ठाण्याचे सहपोलीस आयुक्त दत्तात्रय कराळे, महेश केळुसकर, अशोक बागवे, विजय चोरमारे, संजीवनी तडेगावकर, आप्पा ठाकूर, अनंत राऊत, अशोक कोतवाल, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी आदी मान्यवर कवी सहभागी होतील. तसेच, महेश केळुसकर आणि विजय चोरमारे या संमेलनाचे सूत्रसंचालन करतील.

सोमवार, २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वा. गडकरी रंगायतनमध्ये होणारा हा काव्यसोहळा विनामूल्य असून त्यास रसिकांनी भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

# ३०० अंगणवाडी सेविकांच्या शहापूर ते ठाणे पदयात्रेचा ठाण्यात समारोप

**ठाणे :** शासकीय कर्मचाऱ्याचा दर्जा द्या, दरमहा अर्ध्या पगाराएवढी पेन्शन द्या, मानधनवाढीच्या आश्वासनाची पूर्तता करा, सुसज्ज अंगणवाडी केंद्रे द्या. कार्यक्षम मोबाईल द्या आदी मागण्यांसाठी तीन दिवस चाललेल्या शहापूर ते ठाणे अशी पदयात्रा अंगणवाडी सेविकांनी काढली होती. या पदयात्रेचा समारोप ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे झाला असून त्या पदयात्रेत जिल्ह्यातील ३०० अंगणवाडी सेविका सहभागी झाल्या होत्या. यावेळी जिल्ह्यातील सुमारे दीड हजार अंगणवाडी सेविकांनी सहभाग नोंदविला होता. जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना अंगणवाडी सेविकांनी मागण्यांचे निवेदन दिले.

महाराष्ट्रातील तसेच पालघर व ठाणे जिल्ह्यामध्ये बालकांमध्ये बालमृत्युचे व कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. सध्या अंगणवाडीतील लाभार्थींना दररोज शासनाकडून आठ रुपयाचा पुरक पोषण आहार २०१८ सालापासुन दिला जातो. एवढया रक्कमेमध्ये योग्य ते पोषण होऊ शकत नाही. गेल्या पाच वर्षात महागाई दुप्पटी-तिप्पटीने वाढली आहे. त्यामुळे पुरक पोषण आहारामध्ये दुप्पटीने तरी वाढ केली पाहिजे. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांना टीएचआर दिला जातो. तो निष्कृष्ट दर्जाचा असतो, म्हणुन लाभार्थ्यांना टीएचआर न देता, गरम व ताजा आहार द्यावा, अशी मागणी आहे. केंद्र सरकारने महिला व बालविकास विभाग खात्याच्या बजेटमध्ये अपुरी तरतूद केली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना योग्य सेवा पुरविल्या जाऊ शकत नाही. अंगणवाडी सेविकांना २०१९ मध्ये अंगणवाडीचे कामकाज करण्यासाठी मोबाईल देण्यात आले होते व ते बंद पडले आहे. त्यामुळे त्यांना विनाविलंब मोबाईल मिळणे, आवश्यक आहे. नवीन मोबाईल देणे, पदोन्नती, अंगणवाडीचे केंद्राचे नोव्हेंबर २०२१ पासुनचे थकित भाडे, थकित टीएडीए व श्रीमती. कमल वारे यांना मा. कामगार व औद्योगिक न्यायालयाच्या आदेशानुसार पुर्ववत कामावर घेणे आदी प्रश्न प्रलंबित आहेत. या प्रलंबित मागण्यांसाठी शहापूर ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय अशी पदयात्रा अंगणवाडी सेविकांनी काढली होती. या पदयात्रेला बुधवार २२ फेब्रुवारी रोजी शहापूर येथून सुरुवात झाली. या पदयात्रेत ३०० अंगणवाडी सेविका सहभागी झाल्या होत्या. तीन दिवस चालेल्या या पदयात्रेचा शुक्रवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे समारोप करण्यात आला.

# बी.जे. हायस्कूलचे अडथळे सोडविण्यासाठी आमदार केळकर यांचा पुढाकार

**ठाणे:** ठाण्याच्या टेंभीनाक्यावरील ऐतिहासिक अशी ओळख असलेली बी जे हायस्कुल तब्बल ३२ वर्षा नंतर पुन्हा एकदा मुख्य वास्तूत सुरू झाली आहे. पण शाळा सुरू झाल्या नंतर सुद्धा मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. ते अडथळे सोडविण्यासाठी त्या शाळेचे माजी विद्यार्थी असलेले एन टी केळकर यांच्या नातवाने म्हणजे आमदार संजय केळकर यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच आमदार केळकर यांनी शनिवारी शाळेची पाहणी करत, त्या ते अडथळे सोडविण्याचे आश्वासन ही दिले आहे.



टेंभीनाक्यावर १५० वर्षांची परंपरा असलेल्या बी.जे हायस्कूलच्या इमारतीचे बांधकाम १८७२ मध्ये केलेले होते. मूळ इंग्लिश स्कुल असलेली ही शाळा १४ ऑगस्ट १८८० मध्ये सर बैरामजी जीजीभाय ट्रस्टने रहते घर, जमीन आणि ८ हजार ५०० रुपये शाळेसाठी दानपत्र करून शासनासाठी अर्पण केली होती म्हणून या शाळेचे नाव बैरामजी जीजीभाय ठाणा हायस्कूल (बीजे हायस्कूल) करण्यात आले. १९८४ साली शाळा धोकादायक झाल्याने ही इमारत पाडण्यात आली. तेंव्हापासून या कामाला निधीची तरतूद मिळत नसल्याने काम रखडले होते. त्या इमारतीच्या बांधकामाला २०१४ साली लागणाऱ्या सर्व परवानग्या महापालिकेकडून मिळाल्या. परंतु मधल्या काळात वास्तुविशारद व ठेकेदार यांच्या आडमुठेपणामुळे हे काम वेळेत पूर्ण झाले नव्हते.बी जे हायस्कुल तब्बल ३२ वर्षा नंतर पुन्हा एकदा मुख्य वास्तूत सुरू झाली आहे. पण शाळा सुरू झाल्या नंतर सुद्धा मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. त्या शाळेत प्रवेश घेण्यासाठी पूर्व परीक्षा द्यावी लागत असायची, त्या शाळेची झालेली दुरावस्था पाहवत नाही. शाळेत मुलांची कमी पट संख्या आहे, शाळेत पुरेसे शिक्षक नाहीत, शाळा स्वच्छ ठेवण्यासाठी शिपाई नाही या व इतर समस्यांसंदर्भात आमदार संजय केळकर यांना माहिती मिळाली. त्यांनी शाळेला भेट देत, तेथील समस्या जाणून घेतल्या.

एवढेच नाहीतर त्या लवकरातलवकर मार्गी लावण्याचे आश्वासन ही यावेळी आमदारांनी दिले. तर या शाळेचे आमदार संजय केळकर यांचे आजोबा एन टी केळकर हे माजी विद्यार्थी होते. त्यामुळे आपल्या या शाळेशी त्यांना जीवाला दिसून आला. या पाहणी दौऱ्याला जिल्हा परिषद उप शिक्षण अधिकारी ज्ञानदेव निपुरते, सर्व शिक्षण अभियंता कदम, माजी मुख्याध्यापक लक्ष्मण पाटील, बी जे हायस्कुलचे मुख्याध्यापक बळीराम सपकाळे, कन्या शाळेचे मुख्याध्यापक ठाकरे , राजेंद्र सूर्यवंशी , राजपूत , काळे बाई, पारसी ट्रस्टचे अध्यक्ष परसी कराणी, झरसिस उढणावाला , दारा वाडिया, एड, महेंद्र कोळसकर, माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव उमेश वांद्रे, सद्स्य विद्देश मुरुडकर, रवींद्र देशमुख, रश्मी कानडे व माजी विद्यार्थी व पारसी ट्रस्टचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# अमेरिकेत ही शिवजयंती साजरी

## उलगडला शिवजन्मपूर्व काळापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा प्रवास

**ठाणे:** अमेरिकेतील डॅलस-फोर्टवर्थ येथील वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांनी १९ फेब्रुवारी रोजी मोठ्या दिमाख्यात शिवजयंती साजरी केली. यावेळी,१२५ हून अधिक कलाकारांनी दृक्श्राव्य माध्यमाच्या मदतीने शिवजन्मपूर्व काळापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा प्रवास सर्व प्रेक्षकांसमोर उलगडला. ढोल-ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी, सुमारे १००० हून आधी सभासदांनी सहभाग घेतला होता. यंदा प्रथमच अशा पद्धतीचा कार्यक्रम मंडळातर्फे सादर होतोय आणि ह्यातून पुढच्या पिढीपर्यंत शिवाजी महाराजांचे चरित्र आणि कार्य नेण्यात आम्ही खारीचा वाटा उचलतोय याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.



अमेरिकेतील डॅलस-फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षे शिवजयंती साजरी केली जात आहे. याही वर्षी १९ फेब्रुवारीला मंडळाच्या वतीने शिवजयंती सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना, मंडळाचे सचिव संतोष देशमुख यांनी सांगितले की, सर्व मराठी सण मंडळ साजरे करते आणि शक्यतो ज्यादिवशी तो सण आहे त्यादिवशीच तो साजरा करण्याकडे मंडळाचा कल असतो. यावर्षी शिवजयंती रविवारी असल्यामुळे त्याच दिवशी मंडळाने शिवजयंतीचा विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. तर मंडळाचे खजिनदार श्रीरंग गोल्हार यांनी माहिती दिली की, मंडळातर्फे सभासदांसाठी काही खास कार्यक्रम विनामूल्य असतात. त्यात शिवजयंती सोहळाही असतो. जास्तीत जास्त सभासदांना आपल्या आराध्य दैवतेचा सोहळा साजरा करण्यासाठी सामील होता यावे हा हेतू यामागे आहे.

डॅलस-फोर्टवर्थ महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्ष सतीश थोपटे यांनी यावर्षीचा शिवजयंती सोहळा हा खूप वैशिष्ट्यपूर्ण होते असे सांगितले. डॅलसचे सुजित साठे यांनी शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन राजा शिवछत्रपती हा शिवजन्मपूर्व काळापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंत विविध घटना दाखवणाऱ्या कार्यक्रमात डॅलसचे १२५ हून अधिक कलाकारांनी दृक्श्राव्य माध्यमाच्या मदतीने हा प्रवास सर्व प्रेक्षकांसमोर उलगडला.

या कार्यक्रमानंतर ढोल-ताशाच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी सुमारे १००० हून आधी सभासदांनी हजेरी लावली. मिरवणुकीनंतर सर्व सभासदांसाठी पिठलं-भाकरी, भुरका, असा बेत ठेवण्यात आला होता. सुमारे १२५ हून जास्त कलाकारांनी गेले २-३ आठवडे अथक परिश्रम घेऊन सराव केला आणि सर्व प्रेक्षकांच्या दीर्घ काळ स्मरणात राहील असा कार्यक्रम त्यांच्यापुढे सादर केला. असे सचिन मरीगुद्दी यांनी बोलताना सांगितले. या कार्यक्रमाला रवींद्र खोकराळे, सचिन फुंडे यांनी यांनी मेहनत घेतली.

# फुटलेली जलवाहिनी नेमकी कोणाची?

## जलवाहीनीला गळती महापालिकेचे दुर्लक्ष

## स्थानिकांचा आरोप

**ठाणे:**ठाणे महापालिकेच्या स्वत:च्या योजनेतून पाणी पुरवठा करणाऱ्या एका मुख्य अशुद्ध जलवाहिनीची वेगवेगळ्या सहा ठिकाणी गळती काढण्याचे काम २१ ते २४ फेब्रुवारी या काळात हाती घेतले आहे. त्यामुळे शहराला स्वत:च्या योजनेतून ५० टक्के पाणी कपात केली आहे. त्यातच महापालिकेच्या पूर्वेकडील सॅटीसचे पायलींग करण्यासाठी खोदकाम सुरु असतांना तीन हात नाका येथील सर्व्हिस रोड मंगळवारी रात्री जलवाहिनी फुटली. चोविरुम्स होऊनही त्या जलवाहिनीकडे अद्यापही कोणत्याही शासकीय यंत्रणेचे लक्ष गेले नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला. विशेष म्हणजे फुटलेली जलवाहीनी ठाणे किंवा मुंबई याचा तपास केला जात असल्याने लाखो लीटर पाणी गटारात वाहून गेले.

तीन हात नाका येथील सर्व्हिस रोडवर सॅटीससाठी पायलिंगचे काम जोरात सुरू आहे. याचदरम्यान काम करणाऱ्या यंत्रणेकडून मंगळवारी रात्री जलवाहीनी फुटली गेली आहे. एकीकडे सलग चार दिवस पाणी कपात केली असताना दुसरीकडे या ठिकाणी लाखो लिटर पाणी वाया जात आहे. कामाच्या ठिकाणी असलेल्या संबंधित यंत्रणेचे कर्मचारी व अधिकाऱ्यांना जलवाहिनी नेमकी किती मोठी आहे .तसेच ती ठाणे की मुंबई महापालिकेची आहे हे दोन्ही यंत्रणांना माहित नसल्याचे दिसून आले आहे. येथे काम करणाऱ्या यंत्रणेने दोन दिवसात पाणी थांबविण्यासाठी तब्बल ४ गाड्या आरएमसी टाकून सुध्दा प्रवाह थांबलेला नाही.

ठाणे शहर स्मार्ट सिटी कडे वाटचाल करताना अशा सर्व कामांचे नियोजन देखील जबाबदार अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली स्मार्ट पद्धतीने केले जाणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्याचा नाहक त्रास नागरीकांना झाला नसता. तसेच लाखो लिटर पाण्याची नासाडी टळली असती. त्यामूळे ठामपा आयुक्तांनी तत्काळ या गोष्टीची दखल घेत याला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी शहर कॉंग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी केली आहे.

# संत गाडगे बाबांना राज्यपाल बैस यांचे अभिवादन

संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल रमेश बैस यांनी आज राजभवन येथे त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांच्या पत्नी रामबाई बैस यांनी देखील संत गाडगेबाबांच्या प्रतिमेला अभिवादन केले. राजभवनातील अधिकारी, कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.



# इलेक्ट्रिक वस्तूंच्या दुकानाला आग

**ठाणे:** घोडबंदर रोड,आझाद नगर, ब्रह्मांड,या ठिकाणी असलेल्या मे. माताजी ट्रेडर्स या इलेक्ट्रिक वस्तू असणाऱ्या दुकानाला आग लागल्याची घटना बुधवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास समोर आले. या घटनेत मोठ्या प्रमाणात धूर झाला होता. हे दुकान भर लोकवस्तीत असल्याने एकच खळबळ उडाली होती. आगीवर सुमारे दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नानंतर पूर्णपणे नियंत्रण मिळविण्यात यश आले. यामध्ये कोणालाही दुखापत झाली नसली तरी, दुकानाचे नुकसान झाले आहे. आझाद नगर, ब्रह्मांड येथील मे. माताजी ट्रेडर्स या तळ अधिक ०१ मजली इमारतीमधील इलेक्ट्रिक वस्तू असणाऱ्या दुकानांमध्ये आग लागली. अशी माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्ष, कापूरबावडी पोलीस ,वाहतूक नियंत्रण पोलीस, महावितरण आणि अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. यावेळी०१-फायर वाहन, ०१-रेस्क्यु वाहन व ०१-वॉटर टँकर पाचारण केले होते.

# आठवीतील विद्यार्थीनी महापालिका आयुक्तांसमोर प्रकल्प सादर करते तेव्हा...

**ठाणे** – इंटरनेटचा उपयोग करून मी एक प्रकल्प बनवला आहे, तो तुम्ही पाहाल का...असा प्रश्न गेल्या आठवड्यात ठामपा शाळा क्र.१२० मधील अंशू यादव या आठवीतील विद्यार्थीनीने ठाणे महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांना विचारला होता. बरोबर आठवड्याने अंशूने तिच्या प्रकल्पाचे सादरीकरण आयुक्तांच्याच कार्यलयात मोठ्या हिमतीने केले. विचारलेल्या प्रश्नांना आत्मविश्वासाने उत्तरे दिली. ...आणि सोबत समाधानाने भरलेले क्षण, आयुक्तांनी दिलेली शाबासकी घेऊन अंशू घरी परतली.

गेल्या आठवड्यात, डिजिटल शिक्षण कार्यक्रम-२०२३ या उपक्रमातंर्गत 'अक्षयपात्र' या संस्थेतर्फे ठाणे महापालिकेच्या विविध शाळांमधील आठवीतील एकूण ३८ विद्यार्थ्यांना आयुक्त अभिजीत बांगर यांच्या हस्ते टॅबचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात बांगर यांनी विद्यार्थ्यांशी इंटरनेट, गुगल, त्यावरील सर्च, शास्त्रज्ञ यांच्याविषयी गप्पा मारल्या. त्यांच्या विश्वातील इंटरनेटचा उपयोग जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या गप्पांदरम्यान, अंशू यादव या चुणचुणीत विद्यार्थिनीने तिने केलेला प्रकल्प, त्यासाठी केलेले गुगल सर्च याबद्दल माहिती दिली आणि प्रकल्प पाहण्याचे आमंत्रण आयुक्तांना दिले.

सायंकाळी आयुक्त बांगर यांच्या दालनात अंशू यादवने तिचा छोटेखानी प्रकल्प आणला. सोबत, तिचे वर्गशिक्षक सुरेश पाटील आणि शाळा प्रमुख कल्पना राऊत, तसेच, उपायुक्त



अनघा कदम हेही उपस्थित होते.

अंशूने 'हायड्रॉलिक लिफ्ट'ची प्रतिकृती तयार केली होती. फ्रेंच शास्त्रज्ञ ब्लेस पास्कल यांच्या नावाने प्रसिद्ध असलेल्या पास्कल्स लॉ याचा वापर 'हायड्रॉलिक लिफ्ट' तंत्रात केला जातो. हा नियम द्रव पदार्थावरील दबावाशी संबंधित आहे. एका पात्रात ठेवलेल्या स्थिर द्रवपदार्थावर दिलेला दाब हा त्या पात्रात सर्वत्र समान पसरतो, त्याचा प्रभाव पात्राच्या आतील आवरणावरही असतो. त्यात कोणताही ऱ्हास होत नाही, असा हा नियम. तो समजून घेऊन अंशूने शिक्षकांच्या मदतीने कार लिफ्टची प्रतिकृती तयार केली.

पास्कलच्या या नियमाचा वापर आणखी कोठे केला जातो, प्रवाशांसाठी 'हायड्रॉलिक लिफ्ट' वापरली जाते का...अशा आणखी काही गोष्टींचा अभ्यास करण्याची सूचना आयुक्त श्री. बांगर यांनी अंशूला केली. तिने या प्रकल्पासाठी घेतलेला वेळ, तयारीची पद्धत, शिक्षकांचे मार्गदर्शन आदी गोष्टी आयुक्तांनी जाणून घेतल्या. तिच्या कुतुहलाबद्दल, त्यासाठी केलेल्या मेहनतीबद्दल आणि आत्मविश्वासाने सादरीकरण केल्याबद्दल त्यांनी अंशूचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांच्या मनातील कुतुहल जाणून घेऊन त्या शैक्षणिक गोष्टी, वैज्ञानिक प्रयोग त्यांना आवर्जून दाखवा. त्यासाठी विज्ञान भेटीसारखे प्रयोग राबवा, अशी सूचना श्री. बांगर यांनी उपस्थित शिक्षकांना केली. विद्यार्थी एखादा प्रयोग करतात, तो प्रयोग म्हणजे पुस्तकी ज्ञान प्रत्यक्षात उतरण्याचा प्रयत्न असतो. अशावेळी विज्ञानाचे जे तत्व मोठ्या स्वरूपात जिथे वापरले आहे ते प्रत्यक्ष पाहिल्यास, ते तत्व कायमस्वरुपी त्या विद्यार्थ्यांच्या डोक्यात पक्के बसण्यास मदत होईल. अंशू यादव हिच्या प्रकल्पानुसार, तिला हायड्रॉलिक लिफ्टचा मोठा वापर होणारी ठिकाणे दाखववीत, असेही श्री. बांगर यांनी सांगितले. त्याचप्रमाणे, इंटरनेटचा योग्य वापर करण्याबाबत विद्यार्थ्यांना कायम सजग करत राहा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आयुक्तांच्या दालनाबाहेर आल्यावर, ही भेट आपल्यासाठी लक्षात राहील. मोठ्या अधिकाऱ्याने माझा प्रकल्प पाहण्यासाठी वेळ दिला. त्यामुळे माझा उत्साह आणखी वाढला आहे. या भेटीबद्दल मी मैत्रिणींना सांगणार आहे, हे म्हणताना अंशूच्या चेहऱ्यावर आनंद झळकत होता.

# आता शेवटचे न्यायालय म्हणून जनतेच्या न्यायालयामध्ये जाणार – भास्कर जाधव

**ठाणे:** केंद्रीय निवडणूक आयोगाने विश्वासघात तर केलेलाच आहे, तो राज्यघटनेचा केला , तो लोकशाहीचा केला , तो संविधानाचा केला आणि शिवसेनेचा सुद्धा त्यांनी विश्वासघात केला अशा शब्दात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते व आमदार भास्कर जाधव यांनी टीका केली. पुढे बोलताना,जाधव यांनी कुठल्याच न्यायालयामध्ये न्याय मिळणार नसेल तर आता शेवटचे न्यायालय म्हणून जनतेच्या न्यायालयामध्ये जाऊ. जनतेलाच त्या ठिकाणी सांगायचं की आता न्यायाधीश न्याय करणारा खऱ्या अर्थाने ईश्वर हा जनता जनार्दना म्हणून तूच आहेस, तूच न्याय कर असेही ते म्हटले. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री यांच्यावर टीका करताना भाजपावर ही निशाणा साधला.

ठाण्याच्या गडकरी रंगायतन रविवारी शिवगर्जना यात्रेला सुरुवात झाली. त्यावेळी ते बोलत जोते. याचदरम्यान, त्यांनी बोलताना, देशाच्या यापूर्वीच्या इतिहासात निवडणूक आयोगाने ओरिजिनल चिन्ह आणि नाव हे कुठल्याही गद्दार गटाला दिलेलं नाही ते गोठवण्याचं काम केलं पण देशाच्या ७५ वर्षाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासामध्ये ही पहिली घटना घडली आहे अशी खंत ही त्यांनी व्यक्त केली. आपल्या देशात शिवसेना म्हणजे ठाकरे धनुष्यबाण म्हणजे ठाकरे आहे हे बहुदा निवडणूक आयोगाला माहित नाही. असाही चिमटा त्यांनी काढत, भारतीय जनता पार्टीचे लोक जाहीरपणे सांगत होते,

एकनाथ शिंदे यांना निशाणी मिळेल आणि शिवसेनेचे नाव मिळेल. तुम्ही आनंद साजरा करा जल्लोष साजरा करा हे अगोदर भाजपचे लोक सांगत होते असे बोलून त्यांनी भाजपा लक्ष करताना, कदाचित सही शिक्का हा निवडणूक आयोगाचा असेल निवडणूक आयोगाचा निकाल कुठल्यातरी पक्षाच्या कार्यातून लिहून आला होता आणि फक्त निवडणूक आयोगाला तो दयावयचा होता. असे ही म्हणून भाजपावर जोरदार टीका केली.

# पुन्हा ठाणे शहर पोलिसांचे ऑल आऊट कोबींग ऑपरेशन

**ठाणे :** ठाणे शहर पोलिसांनी ठाणे, भिवंडी, कल्याण डोंबीवली, उल्हासनगर व अंबरनाथ या

पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात पुन्हा एकदा राबविलेल्या ऑल आऊट कोबींग मोहीमेत अवैध्य शस्त्रजप्ती, फरार, अग्नीशस्त्रे बाळगणे, हॉटेल, डान्सबार तपासणे आदींसह इतर प्रकारच्या मोहिमेत १२९ गुन्हे दाखल करत, तब्बल ११६ जणांच्या हाती अवघ्या पाच तासात बेड्या घालण्यात यश आले आहे. तसेच १ लाख १३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

ठाणे शहर पोलीस आयुक्त जय जित सिंह यांच्या आदेशान्वये २४ फेब्रुवारीला रात्री ९ वाजता सुरू होऊन २५ फेब्रुवारी मध्यरात्री १ वाजेपर्यंत ही मोहीम राबविण्यात आली. या मोहीमेत पोलीस सह आयुक्त, अप्पर पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त

## १२९ गुन्हे नोंदवत ११६ जणांच्या हाती घातल्या बेड्या

यांच्या मार्गदशनाखाली पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व गुन्हे शाखेतील सर्व घटकांचे प्रभारी अधिकाऱ्यांच्या मार्फत गुन्हेगारी कृत्याला आळा बसावा या उद्देशाने ऑल आऊट कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले होते. त्यानुसार अवैध्य शस्त्र बाळगणे, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२, अवैध्य धंद्यावर केलेली कारवाई, पॅरोल उल्लंघन आरोपींचा शोध घेणे, वाहने तपासणे, मद्यप्राशन करुन वाहन चालविणे, लॉजेस, डान्सबार, हॉटेल, पब यांची तपासणी करणे, सराईत गुन्हेगारीवरांवर प्रतिंबधक कारवाई करणे आदी मोहीम यावेळी राबविण्यात आली. त्यासाठी २२३ पोलीस अधिकारी व १०५४ पोलीस अंमलदार इतके मनुष्यबळ वापरण्यात आले होते. त्यानुसार १२९ गुन्हा नोंदविण्यात आले असून ११६ जणांना अटक करण्यात आली. तसेच १ लाख १३ हजार ७० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे.

# गुढीपाडवा, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना

## १०० रुपयांत आनंदाचा शिधा

**मुंबई :** गुढीपाडवा तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त शिधापत्रिकाधारकांना १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. याचा लाभ १ कोटी ६३ लाख शिधा पत्रिकाधारकांना होईल. यापूर्वी दिवाळीत हा आनंदाचा शिधा देण्यात आला होता.

अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद व अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधा पत्रिकाधारक शेतकऱ्यांना १ किलो रवा, १ किलो चणाडाळ, १ किलो साखर आणि १ लिटर पामतेल असा आनंदाचा शिधा गुढी पाडव्यापासून पुढील १ महिन्याच्या कालावधीसाठी ई-पॉसद्वारे १०० रुपये प्रतिसंच असा सवलतीच्या दरात दिला जाईल. ई-पॉसची व्यवस्था नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने हा शिधा दिला जाईल. हा आनंदाचा शिधा देण्याकरिता आवश्यक शिधा जिन्नसांची खरेदी करण्याकरिता महाटेंडर्स या ऑनलाईन पोर्टलद्वारे २१ दिवसांऐवजी १५ दिवसांच्या कालावधीत निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली. शिधाजिन्नस खरेदीसाठी पार पडलेल्या निविदा प्रक्रियेत २७९ प्रति संच या दरानुसार ४५५ कोटी ९४ लाख आणि इतर अनुषंगीक खर्चासाठी १७ कोटी ६४ लाख अशा ४७३ कोटी ५८ लाख इतक्या खर्चास देखील मान्यता देण्यात आली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, २७ फेब्रुवारी २०२३


# शिवरायांचा जयघोष करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

**ठाणे:** शिवजयंतीच्या दिवशी छत्रपती शिवाजीमहाराज यांचा जयघोष करणाऱ्या दोन तरुणांवर कळवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकाराबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते, आमदार डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून, असा गुन्हा आपणही करू, असे ट्वीट केले आहे.

**असा गुन्हा आपणही करणार –डॉ.आव्हाड**

मात्र कळवा पोलिसांनी गुन्हा विनापरवानगी रॅली काढल्याप्रकरणी दाखल केल्याचे स्पष्ट केले आहे. कळवा परिसरात मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी भीम नगर येथे राहणारे तुळशीराम साळवे आणि भीमा साळवे यांनी कळवा नाका येथे दुचाकीवरून जाताना तसेच शिवरायांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरातछत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा दिल्या होत्या. या घोषणांमुळे सार्वजनिक शांततेचा भंग झाल्याचा ठपका ठेऊन या दोघांवर भादंवि ३७(१)(३), १३५,अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, याबाबत डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी ट्वीट करून संताप व्यक्त केला आहे. छत्रपती शिवाजी महाराज की जय अशी घोषणा शिवरायांच्या जयंतीलाच देणे, हा जर गुन्हा असेल तर मी पण असा गुन्हा करणार! छत्रपती शिवाजी महाराज की जय ही घोषणा मनामनात आणि मुखामुखात आहे. पोलीस जर अशी अतिरेकी कारवाई करणार असेल आणि शिवरायांवरील प्रेमापासून रोखणार असेल तर ते चालणार नाही. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असला तरी आम्ही या अतिरेकी कारवाईस प्रत्युत्तर देणार!! छत्रपती शिवाजी महाराज की जय असे ट्वीट डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी केले आहे.

# आता ठामपाच्या कळवा रुग्णालयात नातेवाईकांना मिळू लागले विनामूल्य जेवण

**महानगरपालिका, अक्षय चैतन्य संस्था आणि रिलायन्स फाऊंडेशन यांचा उपक्रम**




**ठाणे:** ठाणे महानगरपालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात रुग्णाच्या सेवेसाठी उपस्थित असलेल्या नातेवाईकांना आता दुपारी एक वेळेचे विनामूल्य जेवण मिळू लागले आहे. ठाणे महानगरपालिकेने अक्षय चैतन्य संस्था आणि रिलायन्स फाऊंडेशन यांच्या साथीने हा उपक्रम नुकताच सुरू केला आहे. सुरुवातीला दुपारी १२ ते २ या काळात ही सुविधा उपलब्ध असून त्याला मिळणाऱ्या प्रतिसादाचा अंदाज घेऊन सायं. ७ ते ९ या काळातही भोजनाची सोय करण्याचा विचार असल्याचे महानगरपालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी सांगितले. सध्या सरासरी १५० ते २०० नातेवाईक या योजनेचा लाभ घेत आहेत.

कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात ठिकठिकाणचे रुग्ण येतात. प्रत्येकापाशी पुरेसे मनुष्यबळ नसते. त्यामुळे सोबतीला असलेल्या नातेवाईकावर चांगलाच ताण येतो. अशात त्याला जेवणाची चिंता अधिक त्रासदायक ठरते. त्यातून मार्ग काढण्यासाठी अक्षय चैतन्य संस्थे पुढाकार घेतला. भायखळा येथील मध्यवर्ती स्वयंपाकगृहात जेवण तयार केले जाते. मग मोठ्या डब्यातून ते संबंधित ठिकाणी पोहोचवले जाते. महापालिकेने त्यांना हॉस्पिटलच्या परिसरातीस रात्र निवारा इमारतीत तळमजल्यावर जेवण वाढण्यासाठी जागा दिली आहे. भात, डाळ, भाजी असे नेहमीचे जेवण असते. सुट्टीच्या किंवा सणाच्या दिवशी गोड पदार्थाचाही जेवणात समावेश केला जातो. अन्नाची नासाडी होऊ नये, ते वाया जाऊ नये, या साठी संस्थेचे स्वयंसेवक काळजी घेतात. रुग्णांसोबत येणारे नातेवाईक हे चिंतेने गांजलेले असतात. रुग्णांच्या जेवणाची सोय रुग्णालयातर्फे केली जाते. मात्र, नातेवाईकांना घरून डबा आणणे किंवा बाहेरचे खाणे हाच पर्याय असतो. त्यांचा ताण हलका करण्यासाठी आयुक्तांनी केलेल्या पाठपुराव्यातून विनामूल्य भोजनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्याशिवाय, रुग्णालय प्रशासनाने त्यांना रात्र निवारा, स्वच्छतागृहे याही सुविधा दिल्या असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक अनिरुद्ध माळगावकर यांनी दिली. रुग्णालयातील खिडक्यांवरील रांगा कमी करण्यासाठी जास्तीच्या खिडक्या उघडणे. तपासणी–चाचण्या यांच्यासाठी जास्तीच्या सुविधा देणे. परिसरातील स्वच्छतेला प्राधान्य, तसेच, नवजात बालकांसाठी अतिदक्षता विभागाचे अद्ययावतीकरण आदी गोष्टींची सुरूवात श्री. बांगर यांनी आयुक्तपदाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर झाली आहे. त्यात, नातेवाईकांसाठी विनामूल्य भोजन सुविधाही झाली आहे.एखादी व्यक्ती आजारी पडली तर रुग्णांसहीत नातेवाईकांची तारांबळ उडते. मानसिक ताणतणाव वाढतो, अशावेळी रुग्णांना धीर देण्यासाठी, मानसिक आधार देण्यासाठी रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेल्या रुग्णांचे नातेवाईक यांच्या वेळेचा सदुपयोग व्हावा म्हणून आयुक्त अभिजीत बांगर यांनी रुग्णालयात डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्डबॉय यांच्यासह रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाईकांसाठी मोफत वाचनालय सुरू करण्याचे ठरवले आहे.

# नळपाडा, सुभाषनगर राहिवासींना मिळणार अद्ययावत व्यायाम शाळा, बँक्वेट हॉल, शाळा व उद्यान



**निधी उपलब्ध करून देण्याचे आमदारांचे आश्वासन**

**ठाणे :** ठाणे महानगरपालिका हद्दीतील नळपाडा, सुभाषनगर परिसरातील रहिवासी गेल्या अनेक दिवसांपासून नागरी सुविधा देण्याबाबतची मागणी करत होते. त्यांच्या मागणीला अखेर यश आले आहे. त्यामुळे या राहिवासींना आता व्यायाम शाळा, बँक्वेट हॉल, शाळा व उद्यान लवकरच उपलब्ध होणार असून त्याच्यासाठी लागणार निधी हा महापालिका, शासनातर्फे किंवा आपल्या आमदार निधी देणार असल्याचे आश्वासन आमदार प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी दिले आहे. याबाबत त्यांनी प्रसिध्दीपत्रक काढत त्याबाबत स्पष्ट केले आहे.

आमदार सरनाईक यांच्याकडे स्थानिक नागरिकांकडून याबाबत सातत्याने मागणी होत होती. त्यानुसार महानगरपालिकेच्या अधिकारी व स्थानिक रहिवाश्यांना बरोबर घेऊन शुक्रवारी आमदार सरनाईक यांनी पाहणी केली असता, निळकंठ पाम या विकासकाच्या सुविधा भुखंडावर बांधण्यात आलेल्या मल्टीपर्पज इमारतीच्या पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर या परिसरातील गोरगरीब नागरिकांसाठी बँक्वेट हॉल त्याचबरोबर तळमजल्यावर या परिसरातील तरूणांसाठी अद्ययावत व्यायाम शाळा तसेच शेजारील असलेल्या महानगरपालिकेच्या शाळेसाठी आरक्षित असलेल्या राखीव भुखंडावर इंग्रजी माध्यमाची शाळा व निळकंठ पामच्या विकासकाने दिलेल्या ३७०० चौ.मी.च्या भुखंडावर अद्ययावत उद्यानाची निर्मिती करण्याचा निर्णय यावेळी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला. याचदरम्यान

महानगरपालिकेच्या आरक्षित असलेल्या भुखंडावर होत असलेले अतिक्रमण काढून त्या भुखंडाला कुंपन भिंत घालून महानगरपालिकेने जागा ताब्यात ठेवावी व सुरक्षारक्षकाची नियुक्ती ताबडतोब करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त संजय हिरवडे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना दिले.

याचबरोबर आमदार सरनाईकांनी यासाठी जो निधी लागेल तो महानगरपालिकेकडून, शासनातर्फे अन्यथा आमदार निधीतून देण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे नळपाडा, सुभाषनगर या परिसरातील स्थानिक नागरिकांसाठी अद्ययावत व्यायाम शाळा, बँक्वेट हॉल, शाळा व उद्यानाची निर्मिती होणार आहे. म्हणून स्थानिकांनी आमदार सरनाईक यांचे आभार मानले. असेही शेवटी पत्रकात आमदार सरनाईक यांनी म्हटले आहे.